NAAC Accredited-२०२२
B++ Grade (CGPA २.९६)

# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर

Punyashlok Ahilyadevi Holkar Solapur University, Solapur

केगाव, सोलापूर - ४१३ २५५, महाराष्ट्र (भारत)

दुरध्वनी क्र. ०२१७-२७४४७७८ / ११३/११६ (११ लाईन्स), फॅक्स : ०२१७-२३५१३००,
संकेतस्थळ: http://su.digitaluniversity.ac.in ई-मेल: eligibility@sus.ac.in

## पात्रता विभाग

जा.क्रं.पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०२३-२४/ 882 दिनांक : 27 APR 2023

**प्रति**
**मा. प्राचार्य / प्र. प्राचार्य / संचालक**
**सर्व संलग्नित महाविद्यालये व शैक्षणिक संकुले, विद्यापीठ परिसर, प्रस्तुत विद्यापीठ.**

**विषय : शैक्षणिक वर्ष २०२२-२३ करीता पात्रता त्रुटी पुर्तता करण्याबाबत.**

संदर्भ : विभागाकडील परिपत्रक क्र.१-पुअहोसोविसो/पात्रता विभाग/२०२२-२३/४४४४ दि.१५/०६/२०२२.

महोदय / महोदया,

शैक्षणिक वर्ष २०२२-२३ मध्ये ज्या संलग्नित महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक संकुल यांनी पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रथम वर्षास प्रवेशित विद्यार्थ्यांचे ऑनलाईन पध्दतीने पात्रता अर्ज व पात्रता शुल्क सादर करण्यासाठी व अंतिम पात्रतेसाठी सदर अर्जाची प्रत आवश्यक कागदपत्रासहित प्रस्ताव पात्रता विभागास संदर्भिय पत्रान्वये सादर केले आहेत. सदर प्रस्तावाबरोबर सादर केलेले पात्रता अर्ज व त्यासोबतच्या सहपत्रांची पात्रताकामी छाननी करण्याचे काम चालू आहे. अशा अभ्यासक्रमास प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जातील त्रुटींबाबतची आढळून आलेली माहिती संबंधित महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक संकुलास त्यांच्या Login मध्ये ऑनलाईन पध्दतीने नमूद करण्यात येणार आहे.

तरी संबंधित महाविद्यालये त्यांच्या व विद्यापीठ शैक्षणिक संकुल यांनी त्रुटींबाबतची माहिती त्यांच्या Login मध्ये जाऊन पहावी व त्याप्रमाणे **त्रुटींची पुर्तता १५ दिवसाच्या** आत करण्यात यावी. अन्यथा प्रति विद्यार्थी रु.५००/- प्रमाणे दंडाची रक्कम संबंधित महाविद्यालये व विद्यापीठ शैक्षणिक संकुलास यांच्याकडून वसुल करुनच संबंधित विद्यार्थ्यांची पात्रता कायम करण्यात येईल. तसेच संबंधित विद्यार्थ्यांच्या पात्रता अर्जातील त्रुटींची पुर्तता करताना विद्यार्थ्यांचे ऑलनलाईन स्टेटस रिपोर्ट जोडूनच सर्व कागदपत्रांची पुर्तता विद्यापीठाकडे करावी (ऑलनलाईन स्टेटस रिपोर्ट यादीतील अनुक्रमांक व त्रुटींची कागदपत्रांचे अनुक्रमांक सारखेच असावेत व अपुर्ण त्रुटी स्विकारल्या जाणार नाहीत) त्याचबरोबर पात्रता त्रुटी पुर्तता अहवाल विहित मुदतीत पात्रता विभागास सादर न केल्यास विद्यार्थ्यांची पात्रता Hold वर ठेवण्यात येतील. त्यामुळे या विद्यार्थ्यांचे द्वितीय वर्षांतील संगणक प्रणालीद्वारे प्रवेश होणार नाही. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या होणाऱ्या शैक्षणिक नुकसानिस सदर महाविद्यालय, संस्था व शैक्षणिक संकुल जबाबदार राहील, याची सर्वांनी नोंद घ्यावी.

ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश नियामक प्राधिकरण, मुंबई यांच्यामार्फत प्रवेश होतात, अशा विद्यार्थ्यांचे संबंधित महाविद्यालयांनी Admissions Regulating Authority, Mumbai यांच्याकडे आपल्या स्तरावर पाठपुरावा करुन विद्यार्थ्यांची मान्यता यादी तात्काळ सादर करणे आवश्यक राहील.

कळावे.

**आपला स्नेहांकित,**

**(डॉ. गणपूर शिवकुमार)**
**संचालक, परीक्षा व मुल्यमापन मंडळ**